Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.712
Peer Reviewed Journal

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P006

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'26
Issue–II(II), Volume–XIV

# भारतीय संविधानातील समानता

प्रकाश मोतीराम मेश्राम*
पीएच.डी.विद्यार्थी (समाजशास्त्र विभाग)
–prakashmeshram109@gmail.com

प्रा. डॉ. अशोक ता. बोरकर**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
रा.तु.म.नागपूर, विद्यापीठ, नागपूर

❖ **सारांश :**

भारतीय संविधानात असलेला 'समानतेचा हक्क' हा प्रामुख्याने लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत स्वरुपाचा पाया आहे. तो आपणास सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय न्यायाची हमी देतो. समानतेशी संबंधित तरतुदी संविधानाच्या अनुच्छेद १४ ते १८ मध्ये संविधान निर्मात्यांनी केल्या आहेत. अनुच्छेद १४ हा सर्वांना कायद्यापुढे समानता तसेच कायद्याचे समान संरक्षण प्रदान करतो. अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारे भेदभाव करण्यास मनाई करतो. अनुच्छेद १६ सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता प्रदान करतो. तसेच सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांकरिता विशेष तरतुद आणि आरक्षणाची तरतुद करतो. अनुच्छेद १७ द्वारे अमानवीय अस्पृश्यतेचा अंत करुन सामाजिक समतेला बळकट करण्याचे काम करतो. तर अनुच्छेद १८ पदव्यांची समाप्ती करुन कृत्रिम सामाजिक दर्जा नष्ट करण्याचे कार्य करतो.

समानतेची संकल्पना ही निव्वळ औपचारिक समानतेपूरती सीमित नाही तर ती प्रत्यक्ष समानतेकडेही अंगुली निर्देश करते. अनेक न्यायालयीन व्याख्यांद्वारे या हक्कांची व्याप्ती अधिक व्यापक करण्याचे काम केले आहे. म्हणून 'समानतेचा हक्क' ही निव्वळ कायदेशीर तरतुद नाही तर समाज परिवर्तनाचे प्रभावी स्वरूपाचे साधन होय. भारतीय संविधानात असलेल्या समानतेच्या तरतुदी ह्या समाजातील भेदभाव, अन्याय तसेच विषमता दूर करण्याकरिता महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. तसेच जे लोकशाही मूल्ये आहेत त्यांना मजबूत (दृढ) करण्याचे काम करतात.

❖ **मुख्य बिंदू:** संविधान, समानता, अस्पृश्यता, पदव्या, संधी, भेदभाव

❖ **प्रस्तावना:**

भारतीय संविधानास जगातील सर्वात व्यापक तसेच प्रगत संविधानांपैकी एक समजल्या जाते. संविधानाचा मूलभूत पाया समतेवर आधारित आहे. भारतात विविध जाती, धर्म, संप्रदाय, भाषा, संस्कृती तसेच परंपरा आहेत. त्यामुळे देशात सामाजिक न्याय तसेच समता प्रस्थापित करणे ही अत्यंत महत्त्वपूर्ण गरज होती. या सर्वांचा विचार करुन संविधान निर्मात्यांनी समानतेच्या हक्काला मूलभूत अधिकारांच्या केंद्रस्थानावर ठेवला आहे. त्याकरिता भारतीय संविधानात अनुच्छेद १४ ते १८ मध्ये समानतेसंदर्भात महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत. जात, धर्म, वंश, लिंग, जन्मस्थान या आधारे कोणत्याही प्रकारचा भेदभाव केल्या जाणार नाही. सर्वांना सार्वजनिक रोजगारांमध्ये समान संधी प्रदान केली जाईल. अस्पृश्यतेचा अंत केल्या जाईल तसेच पदव्या समाप्त करण्यात येतील. या सर्व तरतुदींमुळे सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय न्यायाची अंमलबजावणी सुनिश्चित होते. समानता ही निव्वळ कायदेशीर संकल्पना नाही तर ती लोकशाही पद्धतीचा आत्मा आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय संविधानात असलेल्या समानतेच्या तत्त्वाचे अध्ययन करताना त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, घटनेतील तरतुदी, न्यायालयीन व्याख्या तसेच त्याचे समाजावरील परिणाम या संबंधाने सखोल विचार केल्या जाईल. समानतेच्या तत्त्वाचा परिणाम म्हणून भारतीय लोकशाही अधिक सक्षम, न्याय्य तसेच सर्वसमावेशक कशी बनते यावर प्रकाश टाकल्या जाईल.

❖ **अध्ययनाचा उद्देश :**

१) समानतेच्या संकल्पनेची स्पष्टता समजून घेणे. जसे: कायद्यापुढे समानता तसेच संधीची समानता.

२) सामाजिक न्यायाची अंमलबजावणी कशी प्रस्थापित होते ते पाहणे.

३) आरक्षण तसेच विशेष तरतुदींबाबत माहिती करुन घेणे.

४) अनुच्छेद १४ ते १८ याबाबत माहिती करुन घेणे. त्यातील तरतुदी, त्यांचा अर्थ तसेच व्याप्ती समजून घेणे.

५) विविध बाबींच्या द्वारे होणारा भेदभाव रोखण्याकरिता असलेल्या तरतुदींचा अभ्यास करणे.

६) लोकशाही बळकटीकरणातील त्यांची भूमिका कोणती ते समजून घेणे.

❖ **अध्ययन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीयक स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला असून या विषयाशी संबंधित आधार सामग्रीचे संकलन करण्यासाठी विविध पुस्तके, ग्रंथसंपदा, विशेषांक, मासिके, वृत्तपत्रातील प्रकाशित लेख, संदर्भ साहित्य, इंटरनेटवरील माहिती इत्यादींचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण केला आहे.

❖ **भारतीय संविधानातील समानतेच्या तरतुदी-ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

भारतीय संविधानात अंतर्भूत समानतेचा अधिकार ज्यात अनुच्छेद १४ ते अनुच्छेद १८ येतात तो अचानक तयार झालेला नसून दीर्घकाळ चालत आलेला सामाजिक संघर्ष, भारतीय स्वातंत्र्य लढा तसेच विश्वातील लोकशाही विचारसरणी या घटकांचा तो एक परिणाम आहे.

प्राचीन काळापासून भारतात वर्णव्यवस्था त्याचबरोबर जातीव्यवस्था अस्तित्वात आहे. वर्णव्यवस्थेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे जन्माधारित होते. पाचवा वर्ण अर्थात अतिशूद्र यास अस्पृश्य म्हणून लेखल्या गेले व त्यांच्यासोबत अस्पृश्यतेचा व्यवहार केला गेला. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेमुळे समाजात सामाजिक असमानता प्रचंड स्वरूपात होती. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना बंदी घालण्यात आली होती. समाजव्यवस्थेत असलेल्या विषमतेमुळे देशांत सामाजिक क्रांती म्हणून समानतेची संकल्पना मूळ धरु लागली.

सामाजिक विषमतेच्या विरोधात देशात १९ व्या शतकात अनेक सामाजिक सुधारणा चळवळी निर्माण झाल्या. तत्कालीन ब्रिटिश काळात अनेक समाज सुधारकांनी विषमतेच्या विरोधात विचार व कृती करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी सर्वप्रथम सतीप्रथेविरोधात ब्रिटिशांचे लक्ष वेधले. तसेच स्त्रियांच्या अधिकारांसाठी विचार मांडले. महात्मा फुले तसेच सावित्रीबाई फुले यांनी शूद्र अतिशुद्रांना शिक्षण देण्यास सुरवात करुन समतेचा विचार मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. जातीभेदाविरोधात त्यांनी आवाज उठविला तसेच समाजातील विषमतेविरोधात महत्त्वपूर्ण असे कार्य केले. अस्पृश्यता निर्मूलनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. सर्वांनाच मानवी अधिकार प्राप्त व्हावे असा त्यांचा समतेचा विचार दिसून येतो. याशिवाय अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते.

ब्रिटिशांनी भारतात विविध कायदे करुन ही सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कायद्यापुढे समानता असावी असा त्यांचा दृष्टिकोन दिसून येतो. ब्रिटिशांनी त्याकरीता न्यायालयीन प्रणालीचा उपयोग केला. आधुनिक पद्धतीचे शिक्षण देण्यास त्यांनी सुरुवात केली.

ब्रिटिशांच्या विरोधातील स्वातंत्र्यलढ्यात समानतेची मागणी करण्यास सुरुवात झाली. समानता ही राष्ट्रीय चळवळीत केंद्रस्थानी आली.

महात्मा गांधीनी निर्माण केलेले हरिजन आंदोलन तसेच अस्पृश्यतेला केलेला विरोध, पंडित जवाहरलाल नेहरु यांचा लोकशाही समाजवाद याबरोबरच भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसद्वारा केलेली मूलभूत हक्कांची मागणी हे सर्व समानतेच्या अधिकारात असलेले दिसून येतात. १९२८ च्या नेहरु अहवालात प्रथमताच मूलभूत अधिकार सुचविल्या गेले. तर १९३१ च्या कराची ठरावात समान नागरी हक्क, भेदभाव विरोध आणि स्त्री-पुरुष समानतेवर जोर दिल्या गेला.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P006

भारतीय संविधानावर जगातील लोकशाहींचा प्रभाव दिसून येतो. त्यात मॅग्ना कार्टाच्या आधारे राजावर कायद्याचे बंधन, अमेरिका बिल ऑफ राईट्स मधून नागरी स्वातंत्र्य तसेच युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ ह्यूमन राईट्स मधून सर्व मानव समान ह्या बाबी महत्त्वपूर्ण स्वरूपाच्या आहेत.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वतंत्र भारताच्या संचलनासाठी संविधान तयार करण्यात आले. संविधान तयार करतांना संविधान निर्मात्यांनी देशातील सामाजिक वास्तव लक्षात घेवून समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामते 'राजकीय लोकशाही टिकवायची असेल तर सामाजिक लोकशाही निर्माण करणे आवश्यक आहे.' हे लक्षात घेऊन केवळ समानता जाहीर न करता त्यावर ठोस उपाय म्हणून आरक्षण, अस्पृश्यता बंदी तसेच पदव्यांची समाप्ती अश्या तरतुदी केल्या गेल्या. यातून समानता निर्माण करण्यासाठी विविध अनुच्छेद जसे अनुच्छेद १४ - कायद्यासमोर समानता, अनुच्छेद १५ - भेदभावास प्रतिबंध, अनुच्छेद १६ - सार्वजनिक नोकरीत समान संधी, अनुच्छेद १७ - अस्पृश्यतेचा अंत आणि अनुच्छेद १८ पदव्यांची समाप्ती असे अनुच्छेद तयार झालेत. हा अधिकार केवळ कायदेशीर तत्त्व नसून त्यामागे हजारो वर्षांपासून होणाऱ्या अन्यायासंदर्भातील तो एक प्रतिसादच आहे.

❖ **संविधानातील समानतेच्या तरतुदी :**

भारतीय संविधानात समानता निर्माण करणाऱ्या प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

**१. अनुच्छेद - १४ कायद्यासमोर समानता :**

भारतीय समाज हा सामाजिकदृष्ट्या विषमतेच्या आधारावर उभा आहे. यात प्रचंड प्रमाणात उच्च-निचता आपणास दिसून येते. आर्थिकदृष्ट्याही प्रचंड विषमतेने तो बरबटलेला आहे. अशा या विषमतेला नष्ट करण्यासाठी भारतीय संविधानातील अनुच्छेद १४-कायद्यासमोर समानता हे एक जालिम औषध आहे. ''ही तरतुद कायद्याचे वर्चस्व किंवा कायद्याचे राज्य असल्याचे प्रतिपादन करते'' (Lal, 68). संविधानातील ''कलम (अनुच्छेद) १४ एक महत्वाचा मूलभूत अधिकार प्रदान करते, ज्याचे बारकाईने आणि दक्षतेने रक्षण केले पाहिजे'' (Joshi, 61). इतके त्याचे महत्त्व आपणास दिसून येते.

'कायद्यासमोर समानता' तसेच 'कायद्याचे समान संरक्षण' या दोन्ही संज्ञा समान नसून त्यांचा अर्थ विभिन्न आहे. ''कायद्यासमोरील समानता ही कायद्याच्या नियमाच्या कल्पनेशी सुदृढ सामाजिक सुव्यवस्थेसाठी लागणाऱ्या सर्वांगिण मूल्यमापणाशी सहसंबंधित आहे. कायद्यासमोर समानतेचे तत्व हा एक कायद्याच्या नियमाच्या कल्पनेला आवश्यक असलेला उपसिद्धांत आहे. त्या अन्वये कोणत्याही व्यक्तिच्या लक्षामध्ये कोणत्याही विशेषाधिकारांच्या अनुपस्थितीला लागू करणारा तो भारताच्या प्रदेशातील सर्व व्यक्तिंच्या समानतेचा जाहीरनामा आहे'' (बसू, १०९). अर्थात कोणतीही व्यक्ती ही तेथील कायद्याहून वरचढ नाही तर ती कायद्याच्या अधिन आहे. तर ''कायद्याचे समान संरक्षण याचा अर्थ 'समान लोकांसाठी कायदा समान असेल आणि समानरित्या प्रदर्शित केला जाईल, म्हणजेच एकसमान असणाऱ्यांबरोबर एकसमान वर्तणूक करण्यात यावी.' समान संरक्षणासाठी असमानांना सुविधा आणि संधी देऊन राज्याने असमानांच्या बाबतीत सकारात्मक कृती करण्याची आवश्यकता आहे. 'सकारात्मक समानता' आणि 'वितरणात्मक न्याय' हे कायद्यासमोर समान न्यायाच्या, समान संरक्षणाच्या हमीला समजून घेण्याचा गाभा आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये समान पातळीवरील क्षेत्र निर्माण करण्यासाठी राज्य असमानांना वेगवेगळी वागणूक देऊ शकते'' (बसू, १११). यासाठीच भारतीय संविधानात दरएक व्यक्तिला कायद्यासमोर समान लेखण्याची त्याचबरोबर कायद्याच्या समान संरक्षणाची हमी नागरिकांना देण्यात आली आहे. ''हा सिद्धांत (तत्व) प्रत्यक्षात लोकशाही प्रजासत्ताकाच्या तत्वाला मूर्त स्वरूप देतो'' (मल, १२०).

समानतेच्या हक्काच्या संदर्भात भौगोलिक कारणांसाठी किंवा विशिष्ट हेतूंनी वर्गीकरण करतांना कायद्याच्या घोषित उद्दिष्टांशी त्याचा संबंध असला पाहिजे अशी भूमिका न्यायालयांनी घेतल्याची दिसून येते. ''१९५२ च्या पश्चिम बंगाल विरुद्ध अन्वर अली या खटल्याच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले की, राज्यसत्तेची कृती रास्त, न्याय्य आणि वाजवी असली पाहिजे. १९९३ च्या इंदिरा साहणी विरुद्ध केंद्रसरकार या खटल्यात तर सर्वोच्च न्यायालयाने राज्यसत्तेला कृतिशीलतेसाठी आणखी अवकाश मोकळा

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P006

करुन दिला. त्या निकालात असे सांगितले की, अनु. १४ चे आकलन मार्गदर्शक तत्वांच्या प्रकाशात करुन घेतले पाहिजे'' (भोळे, ८७). याशिवाय समान कामासाठी समान वेतन देणे हे देखील अनुच्छेद १४ मध्ये अंतर्भूत असून ते न्याय्य आहे. मग तो पुरुष असो अथवा स्त्री.

पारंपारिक समाजात स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन दिले जात नव्हते. ते दूर करण्याचे काम संविधानातील अनुच्छेद-१४ ने केले. त्यामुळे स्त्रियांचे आर्थिक शोषण कमी होण्यास मदत झाली आहे. समान कामासाठी समान वेतन त्यांना लागू आहे जे सर्व बाबतीत समान स्थानावर काम करतात.

**२. अनुच्छेद १५ - भेदभावास प्रतिबंध:**

अनुच्छेद १४ हे कायद्यासमोर समानता तसेच कायद्याच्या समान संरक्षणाची हमी देते तर अनुच्छेद १५ हे प्रामुख्याने काही घटकांना भारतीय नागरिकांच्या संबंधाने सामान्य तत्व लागू करण्यास निर्देशित करते.

अनुच्छेद १५ अन्वये राज्याला देशातील कोणत्याही नागरिकाला त्याच्या धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अथवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव भेदभाव करता येणार नाही असे स्पष्ट निर्देशित करते. अर्थात सर्व कायदे दोन्ही लिंगाच्या सदस्यांना समान पद्धतीने लागू केले जावेत. यात असे स्पष्ट होते की, लिंगाच्या आधारे भेदभाव करता येणार नाही. उपरोक्त ''कोणत्याही एका किंवा अनेक कारणांवरील भेदभाव आणि इतर कोणत्याही आधारावर या अनुच्छेदद्वारे प्रभावित होणार नाही (दत्तात्रेय वि. मुंबई राज्य, एचआयआर १९५३ बीओएम ३११)" (काश्यप, ८१) यात याबाबत असा निर्णय दिल्या गेला. अनुच्छेद १५ मध्ये हमी दिलेला हक्क हा एखाद्या नागरिकाला एक व्यक्ती म्हणून बहाल केला जातो. त्यामुळे तो लिंगाच्या आधारे अथवा अन्य कारणांच्या आधारे भेदभावास प्रतिबंध करतो.

अनुच्छेद १५ (२) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकाला केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन (क) दुकाने, सार्वजनिक उपहारगृहे, हॉटेल तसेच सार्वजनिक करमणूकीची ठिकाणे यातील प्रवेश अथवा (ख) पूर्णतः किंवा अंशतः राज्याच्या पैशाने निर्माण केलेल्या विहिरी, टाक्या यांचा वापर, अंघोळीचे घाट, रस्ते आणि सार्वजनिक उपभोगाच्या जागा वापरण्यास भेदभाव नसेल'' (आंबेडकर, २०२२, ३७). याचा बराच परिणाम स्त्रियांच्या सामाजिक दर्जावर दिसून येतो. पुरुषांबरोबर समान अधिकार याद्वारे त्यांनाही प्राप्त झाला आहे.

अनुच्छेद १५ (३) मध्ये असे नमुद आहे की, स्त्रिया आणि बालकांच्या कल्याणासाठी राज्याला विशेष तरतुद करता येईल. यामध्ये स्त्रियांची कमकुवत शारीरिक स्थिती लक्षात घेऊन संरक्षणात्मक भेदभाव केल्याचे दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे स्त्रियांची शारीरिक रचना आणि मातृत्वाची कार्यक्षमता होय. तर अनुच्छेद १५(४) हे राज्याला नागरिकांच्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीसाठी अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या करिता विशेष तरतुद करण्याचे अधिकार देते. यावरुन अनुच्छेद १५(३) आणि १५(४) यात भेदभाव न करण्याच्या सर्वसाधारण तत्वाला अपवाद असल्याचे दिसून येते. याबाबतचे युसुफ अबुल अझीझ वि. मुंबई राज्य, एआयआर १९५४ एससी ३२१, मद्रास राज्य विरुद्ध चम्पेकन दुराईराजन, एआयआर १९५१ एससी २२६ हे निर्णय महत्त्वपूर्ण आहेत.

अनुच्छेद १५(३) ची व्याप्ती एवढी आहे की, स्त्रियांसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाबरोबरच कोणत्याही विशेष तरतुदींचा अंतर्भाव करण्याइतकी विस्तृत असल्याची दिसून येते. प्रामुख्याने स्त्रिया हया आपल्या समाजाचा एक दुर्बल घटक असून त्यांच्या उन्नतीसाठी अनुच्छेद १५(३) बनवले गेले असून त्याचा शक्य तेवढा व्यापक अर्थ लावला जाणे अपेक्षित आहे.

अनुच्छेद १५(४) मुळे जी समस्या निर्माण झाली ती म्हणजे 'सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय' कोण हे ठरविणे होय. हे निश्चित करण्यासाठी त्यासाठी योग्य निकष तयार करताना अनेक घटक त्यांची भूमिका बजावतात. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विशिष्ट वर्ग मागास आहे की नाही हे ठरविण्यासाठी व्यक्तीची जात हा एकमेव निकष असू शकत नाही. अन्यत्र सर्वोच्च

न्यायालयाने असा निर्णय दिला की, व्यक्तीचा मागासलेपणा सुनिश्चित करण्यासाठी जात आणि गरिबी या दोन्ही बाबी संबंधीत आहेत. परंतु केवळ मात्र जात किंवा केवळ गरिबी हा निर्धारणाचा निकष ठरणार नाही.

**३. अनुच्छेद १६ - सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत संधीची समानता :**

अनुच्छेद १५ अन्वये राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग अथवा जन्मस्थळाच्या आधारावर भेदभाव करणार नाही. या साधारण आश्वासनाच्या आधारे संविधानाने सरकारी नोकऱ्यांच्या बाबतीत संधीच्या समानतेची नागरिकांना हमी दिली आहे. सार्वजनिक सेवांमधील नोकऱ्यांमध्ये प्रवेश देतांना कोणत्याही प्रकारे भेदभाव होणार नाही यासंबंधाने अनुच्छेद १६ मध्ये स्पष्ट केले आहे की, राज्यातील सार्वजनिक सेवायोजनामध्ये कोणत्याही जागेवर त्यांनी ग्रहन केलेल्या पात्रतेनुसार नेमले जाण्यासाठी सर्व नागरिकांना समान स्वरुपाची संधी प्राप्त होईल. यात केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान, निवासस्थान इ. कारणांवरुन अथवा कोणत्याही नोकरीकरिता अगर त्या पदाला अपात्र ठरणार नाही अथवा त्यांच्या बाबतीत कुठल्याही स्वरुपाचा भेदभाव केला जाणार नाही. याद्वारे प्रत्येकाला आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी समान संधी समतेच्या अधिकारात दिलेली आहे.

अनुच्छेद १६(१) आणि १६(२) अन्वये राज्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कार्यालयातील नोकरी अथवा नियुक्ती संबंधीत बाबीत राज्य सर्वांना समान संधी देईल. हा सर्वसाधारण नियम मूर्त स्वरुप धारण करताना दिसून येतो आणि उपरोक्त कोणत्याही कारणाने त्याच्या सोबत भेदभाव केला जाणार नाही. या तरतुदी कायद्यापुढे समान तत्वाचा तसेच संविधानाच्या प्रस्ताविकेतील ठरलेल्या दर्जा आणि संधीच्या समानतेच्या उद्दिष्टांचा एकूणच विस्तार आहे. या तरतुदीचा मुख्यार्थ रोजगाराच्या बाबतीत स्त्रियांना समान अधिकार आहे आणि पुरुष म्हणून राज्य हे स्त्रियांविरुद्ध भेदभाव करणार नाही.

अनुच्छेद १६(१) आणि १६(२) अंतर्गत अशा कायद्याला आव्हान सुद्धा दिले जाऊ शकते. याबरोबरच या अनुच्छेदांद्वारे पुरुष आणि स्त्रिया कर्मचाऱ्यांमध्ये पदोन्नतीचे मार्गदेखील प्रतिबंधीत आहेत. ''संधीच्या समानतेचे खरे महत्त्व फक्त कायदेशीर समानतेपुरतेच मर्यादित नाही. त्याचे अस्तित्व हे केवळ अक्षमतेच्या अभावांवर अवलंबून नाही तर क्षमतेच्या असण्यावर आणि प्रत्येक संवर्ग श्रेणीमध्ये संधीच्या श्रेष्ठत्वावर आहे; कारण संधीची समानता याचा अर्थ वेगवेगळया स्वतंत्र वर्गातील समानता नसून कर्मचाऱ्याच्या समान वर्गाच्या सदस्यांमधील समानता असा आहे'' (बसू, १२०).

अनुच्छेद १४, १५ आणि १६ ची तुलनात्मक व्याप्ती लक्षात घेता असे दिसून येते की, ''अनुच्छेद १४ ने समानतेच्या नियमाची विस्तृत संज्ञा घालून दिली आहे. तर अनुच्छेद १५ मध्ये विशिष्ट आधारावर भेदभाव प्रतिबंधीत करतो; परंतु तो राज्याच्या सर्व उपक्रमांचे संपूर्ण क्षेत्र समाविष्ट करतो. अनुच्छेद १६ मध्ये देखील तेच नियम आहेत; परंतु त्याची त्यातील व्याप्ती जरा संकुचित आहे; कारण तो राज्याच्या अखत्यारितीतील पदे अथवा नोकऱ्याशी संबंधीत राज्याच्या उपक्रमांतर्गतच सीमित आहे. अनुच्छेद १५ आणि १६ दोन्हीही त्यांच्यामध्ये नमुद केलेल्या अपवादांना अधिन राहूनच कार्यरत असतात'' (बसू, १२४). एकंदर अनुच्छेद १६ सर्वांनाच नोकरीतील अधिकार बहाल करुन त्यांना उचित न्याय देण्याचे कार्य करतो.

**४. अनुच्छेद - १७ अस्पृश्यतेचा अंत:**

भारतीय संविधानात समानतेमध्ये अनुच्छेद-१७ महत्त्वपूर्ण आहे. जे भारतीय समाजात अस्पृश्यता निर्मूलनासाठी अत्यंत क्रांतिकारी तसेच सामाजिक न्यायाला बळ देणारे प्रावधान आहे.

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला आहे. त्यात विविध जाती, धर्म, पंथ, संप्रदाय, भाषा आणि संस्कृती हे घटक येतात. या विविधतेत मात्र काही अनिष्ठ सामाजिक कुप्रथा देखील आहेत. त्या प्रामुख्याने खोलवर रुजलेल्या दिसून येतात. त्यापैकी अस्पृश्यता ही अमानवीय तथा अन्यायकारक असलेली प्रथा आहे. शुद्र आणि अतिशुद्रांवर ही प्रथा लादल्या गेली असून ती सामाजिक बहिष्काराची एक पद्धत आहे. यामुळे करोडो लोक अनेक मानवीय अधिकारांपासून वंचित राहिलेले आहेत.

हिंदू समाज जातीव्यवस्थेने बनलेला आहे. या जातीव्यवस्थेशी अस्पृश्यता ही निगडीत असून ती एक अनिष्ठ सामाजिक प्रथा आहे. शुद्ध-अशुद्धतेच्या आधारे यात विभाजन करण्यात आले आहे. यात शारीरिक तथा सामाजिक संबंध विच्छेद केले जातात. याद्वारेच काही लोक हे अस्पृश्य मानल्या गेले. याचे मूळ हे सामाजिक, धार्मिक तसेच सांस्कृतिक परंपरांमध्ये दिसून येते. अस्पृश्यतेमध्ये ''विटाळ, भ्रष्टता, बाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे, हे सर्वजन मान्य करतील'' (आंबेडकर, २००५, ९). अशी ही अस्पृश्यता प्रामुख्याने जन्म, संस्कार, लग्न, संभोग, स्त्रियांच्या रजस्वला होण्याचा काळ आणि मृत्यू इत्यादी कारणांमुळे निर्माण होत असते. यातून मुक्त होण्याकरिता शुद्धिकरणाच्या विधीद्वारे अस्पृश्यता घालविता येते. त्यामध्ये ''कापड बदलविणे, केस, नखे इत्यादी कापणे, घाम काढणे, आगीत तापविणे, धूर देणे, सुगंधी द्रव्ये जाळणे आणि एखाद्या झाडाच्या डहाळीने वार घालणे इत्यादीचा समावेश होत होता'' (आंबेडकर, २००५, १३). अशी ही अस्पृश्यता भारतात एका विशिष्ट समुदायावर लादण्यात आली आहे.

**अस्पृश्य कोण? -** हिंदू समाजाची रचना वर्णव्यवस्थेवर आधारित असून त्यामध्ये ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशी उतरंड दिसून येते. शुद्राखालोखाल अतिशुद्र जे अस्पृश्य समजले जातात, हे वर्ण श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या आधारावर आहे त्यात अस्पृश्यांचा क्रमांक शेवटचा आहे. त्यास पाचवा वर्ण असेही समजल्या जाते. धार्मिक ग्रंथांच्या आधारे अस्पृश्य वर्गास अन्य वर्गांपेक्षा सर्वच अधिकारांनी बेदखल केल्याचे दिसून येते. शिक्षण, मंदिरप्रवेश तथा सार्वजनिक सोई-सुविधांपासून त्यास वंचित ठेवल्या गेले. मोठ्या प्रमाणात त्याच्यासोबत भेदभाव केला गेला. तो केवळ सामाजिक भेदभाव नसून त्याचे स्वरुप मानसिक तसेच शारिरीक होते.

अस्पृश्यांवर मनुस्मृतीकाळात मोठ्या प्रमाणात जुलूम केला जात. त्यांना गावात राहण्यास मनाई होती. गावाच्या बाहेर त्यांची वस्ती असे. त्यांची तर सावलीही अपवित्र मानली जाई. त्यांच्या वाट्याला निकृष्ठ स्वरुपाची कामे होती. पराकोटीच्या अत्याचारास त्यांना सामना करावा लागे. ब्रिटीश भारतात ''भारत सरकारने १९३५ साली अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींची यादी तयार केली ज्यांना 'अनुसूचित जाती' म्हणतात. त्यात विविध प्रांतानुसार जातींची यादी आहे. त्यात एकूण ४२९ जातीचा समावेश आहे, त्यांची संख्या त्या काळात सुमारे पाच ते सहा कोटी होती'' (आंबेडकर, २००५, १८-२५). वर्तमानात ''भारतात अनुसूचित जाती ७५१ आहेत'' (Singh, 42). २०११ च्या जनगणनेनुसार त्यांची एकूण लोकसंख्या १६.६% इतकी प्रचंड आहे. आजही मोठ्या प्रमाणात या जातींची हेटाळणी केली जाते. त्यांचा स्पर्शही सहन केला जात नाही म्हणूनच ते अस्पृश्य होत.

अशी ही अस्पृश्यता केवळ हिंदूमध्येच नाही तर ''अहिंदू भारतीय समाजात प्रामुख्याने ख्रिश्चन व मुस्लिमांमध्ये अजूनही अस्पृश्य वर्ग आहेत. पण ते हिंदूपेक्षा वेगळी वैशिष्ट्ये ठेवतात. काही अध्ययनाच्या द्वारे असे दिसून आले की, भारतीय ख्रिश्चन समाज हा पूर्वश्रमीच्या वर्णव्यवस्थेशी संबंध ठेवतो व सामाजिक दृष्ट्या अस्पृश्य-ख्रिश्चनांना वेगळी वागणूक देतो. इस्लाम धर्मात अस्पृश्यतेला स्थान नाही हे तत्वतः सर्वमान्य असले तरी व्यवसाय (घान स्वच्छ करण्याचे काम) व शारिरीक अस्वच्छता (संभोग, लघवीच्या भागास स्पर्श झाल्यास, आदी) या आधारे तात्पुरते अस्वच्छतेचे/अस्पृश्यतेचे पालन होते. धार्मिक किंवा पवित्र स्थानी जाताना शारीरिक अस्वच्छतेचे पालन केल्यास कोणताही भेदभाव होत नाही. शिख धर्मात धर्मोपदेशक जातीभेद व स्पृश्या-अस्पृश्यता पाळत नाहीत. पण प्रत्यक्षात परंपरांना छेद देणे कठिण होत असल्याने जाती आधारावर भेदभाव या समाजात पंजाबच्या काही क्षेत्रात अजूनही आहे. अस्पृश्य शिख समाज 'मजहबी शिख' म्हणून ओळखल्या जातो. रामदासी व रविदासी हे मुळचे चमार अजूनही शिखांमध्ये सर्वात खालच्या वर्गात येतात'' (मेश्राम, बोरकर, ७३). एकंदर ही अहिंदूतील वेगळ्या प्रकारची अस्पृश्यताच आहे.

**अस्पृश्यतेचा अंत -** भारतीय संविधानाने मूलभूत हक्कांमध्ये समानतेचा हक्क नागरिकांना दिला तो अत्यंत महत्वाचा आहे. या हक्कांतर्गतच अनुच्छेद १७ मध्ये अस्पृश्यतेच्या अंताची तरतुद करण्यात आली आहे. याद्वारे शतकानुशतके ज्या जातींना अस्पृश्य मानून त्यांच्यावर जो सामाजिक, धार्मिक तथा आर्थिक अन्याय केला जात होता त्या अनिष्ठ प्रथेला पूर्णविराम देण्याकरिता संविधानकर्त्यांनी अनुच्छेद १७ संविधानात समाविष्ठ केला. अनुच्छेद १७ अन्वये ''अस्पृश्यता नष्ट करण्यात आली आहे व तिचे

कोणत्याही स्वरूपातील आचरण निषिद्ध करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्भवणारी कोणतीही निःसमर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल'' (आंबेडकर, २०२२, ३९). अर्थात कोणालाही त्याच्या जातीच्या आधारे अस्पृश्य मानून त्यास सार्वजनिक ठिकाणी प्रवेश नाकारणे अथवा त्याच्याशी भेदभाव करणे कायद्याने गुन्हा आहे. असे करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते. या अनुच्छेदाच्या अंमलबजावणीकरिता शासनाने काही कायदे केले आहेत त्यात १) नागरी हक्क संरक्षण अधिनियम-१९५५ लागू करण्यात आला तसेच २) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम-१९८९ लागू करुन अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी कठोर शिक्षा व विशेष न्यायालयांची तरतुद करण्यात आली आहे.

अनुच्छेद १७ मुळे समाजामध्ये समता, बंधुता तसेच सामाजिक न्याय या मूल्यांना बळ प्राप्त झाले आहे. दलित-वंचितांना सन्मानाने जगण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.

**५. अनुच्छेद-१८ पदव्यांची समाप्ती :**

भारतीय संविधानातील भाग ३ मधील मूलभूत हक्कात अनुच्छेद १८ द्वारे पदव्यांची समाप्ती करण्यात आली असून त्याचा मुख्य उद्देश देशात समानतेची भावना निर्माण करणे तसेच होणारा सामाजिक भेदभाव टाळणे हा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात देशावर ब्रिटीशांचे राज्य होते. त्या काळात 'सर', 'रायबहादूर', 'खानबहादूर' यांसारख्या पदव्या काही लोकांना दिल्या जात असे. याद्वारे त्यांना विशेष असा दर्जा दिल्या जात असे. यामुळे सामाजिक विषमतेला खतपाणी दिल्या जाई. मात्र भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या संचलनासाठी संविधानाची निर्मिती करण्यात आली आणि या परंपरेला अनुच्छेद १८ अन्वये समाप्त करण्यात आले आहे. अर्थात या पदव्यांची समाप्ती करण्यात आली आहे.

''अनुच्छेद १८ (१) नुसार राज्याकडून पदव्या देण्यास मनाई करण्यात आली आहे. अर्थात कोणत्याही भारतीय नागरिकाला राज्य पदवी देऊ शकत नाही. असे असले तरी राज्य लष्करी किंवा शैक्षणिक सन्मान देऊ शकते. त्यास परवानगी देण्यात आली आहे. जसेः डॉक्टर (Ph.D) तसेच मेजर, कर्नल इत्यादी.

अनुच्छेद १८(२) नुसार भारतीय नागरिक कोणत्याही देशाकडून कोणताही किताब (पदवी) स्वीकारु शकत नाही. त्यास याद्वारे मनाई करण्यात आली आहे. अर्थात कोणत्याही भारतीय नागरिकांनी अन्य देशाकडून कोणताही किताब (पदवी) स्वीकारु नये.

अनुच्छेद १८(३) नुसार भारतीय नागरिक नसलेली कोणतीही व्यक्ती ती राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही लाभाचे अथवा विश्वासाचे पद धारण करत असेल तर राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कोणत्याही परकीय देशाकडून कोणतीही पदवी (किताब) स्वीकारण्यास बंदी आहे.

अनुच्छेद १८(४) नुसार भारत सरकारच्या अधिपत्याखालील कोणत्याही पदावर असलेली व्यक्ती राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय परकीय देशाकडून कोणतीही भेट, सन्मान अथवा पद स्वीकारणार नाही'' (आंबेडकर, २०२२, ३९).

देशातील राष्ट्रीय पुरस्काराबाबत मात्र ते लागू पडत नाही. कारण भारतात 'भारतरत्न', 'पद्मविभूषण', 'पद्मभूषण', 'पद्मश्री' अशा प्रकारचे राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाद्वारे बालाजी राघवन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या १९९६ च्या प्रकरणात स्पष्ट केले की, हे पुरस्कार कोणत्याही प्रकारच्या पदव्या नाहीत तसेच ते कायमस्वरुपी नावापुढे लावता येत नाही. ते केवळ सन्मान म्हणूनच दिले जातात. यामुळेच ते अनुच्छेद १८ चे उल्लंघन मानल्या जात नाही.

अनुच्छेद १८ पदव्यांची समाप्ती याद्वारे समाजात सामाजिक समानता राखल्या जाते. त्यामुळे विशेष वर्ग यातून निर्माण होऊ देत नाही. या अनुच्छेदाद्वारे लोकशाही तसेच प्रजासत्ताक मूल्यांना जपले जाते. याद्वारे ब्रिटिशकालीन भेदभावपूर्ण परंपरा समाप्त झाली आहे.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P006

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'26
Issue–II(II), Volume–XIV

थोडक्यात भारतीय संविधानातील समानतेच्या अधिकाराचा भाग म्हणून अनुच्छेद १८ समजल्या जातो. तो देशात कोणासही विशेष सामाजिक दर्जा देणाऱ्या पदव्या देण्यास प्रतिबंध करतो तसेच सर्व नागरिक हे समान आहेत या संकल्पनेस दृढ करण्याचे काम करतो.

## ❖ भारतीय संविधानातील समानतेच्या तत्वाचा परिणाम :

समानतेचा हक्क भारतीय संविधानात अनुच्छेद १४ ते १८ मध्ये दिलेला आहे. समानतेच्या हक्काचा परिणाम अनेक घटकांवर झालेला आहे. त्यात प्रामुख्याने सामाजिक, राजकीय, प्रशासकीय, न्यायालयीन तसेच आर्थिक क्षेत्रावर व्यापक स्वरुपात दिसून येतो. समानता निव्वळ कायदेशीर तरतुद नाही तर ती समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरलेली आहे.

**१) सामाजिक परिणाम -** समानतेच्या हक्कामुळे सामाजिक परिणाम दिसून येतात. त्यात अनुच्छेद १५ आणि १७ याद्वारे धर्म, वंश, जात, लिंग याद्वारे होणारा भेदभाव कमी होण्यास मदत झाली आहे. प्रामुख्याने अस्पृश्यतेचा अंत हा एक समाज क्रांतीचा महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे. स्त्रियांना शिक्षण, नोकरी तसेच राजकारणामध्ये पुरुषांबरोबर समान संधी मिळू लागली. स्त्री सक्षमीकरणासाठी या तरतुदींना घटनात्मक आधार प्राप्त झाला आहे. त्याबरोबरच दूर्बल घटक यात अनुसूचित जाती, जमाती तसेच इतर मागासांना अनुच्छेद १५(४) आणि १६(४) मुळे शिक्षण आणि नोकरीत प्रतिनिधित्व मिळाले आहे.

**२) राजकीय परिणाम -** या तरतुदींमुळे लोकशाही बळकट होण्यास मदत झाली आहे. कायद्यापुढे समानता असल्याने शासनामध्ये पारदर्शिकपणा तसेच जबाबदारी वाढली आहे. सर्व नागरिकांना प्रौढ मताधिकारामुळे मतदानाचा त्याचबरोबर निवडणूक लढविण्याचा समान अधिकार मिळाल्याने लोकशाही अधिक स्वरुपात सर्वसमावेशक बनलेली आहे.

**३) प्रशासकीय परिणाम -** अनुच्छेद १६ च्या आधारे सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये समान संधी गुणवत्तेच्या आधारे प्राप्त झाली आहे. अनुच्छेद १४ मुळे कायद्याचे राज्य प्रस्थापित झाले आहे. अर्थात कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही.

**४) न्यायालयीन परिणाम -** समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन झाल्यास नागरिक न्यायालयात त्याबाबत दाद मागू शकतात. यामुळे न्यायालयीन हस्तक्षेप वाढलेला दिसून येतो. उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयांनी अनेक महत्त्वपूर्ण असे निर्णय देऊन समानतेच्या तत्त्वांनी व्याप्ती वाढविण्याचे कार्य केलेले आहे.

**५) आर्थिक स्वरूपाचा परिणाम -** या तरतुदींमुळे शिक्षण तसेच रोजगार क्षेत्रांमध्ये समान संधी मिळाल्याने आर्थिक प्रगतीला चालना मिळाली आहे. तसेच आरक्षण धोरण आणि अन्य कल्याणकारी योजनांमुळे समाजातील आर्थिक विषमता कमी करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न झालेला आहे.

असे जरी असले तरी त्यास अनेक मर्यादा आणि आव्हाने असल्याने समाजात आजही लैंगीक तसेच जातीय भेदभाव दिसून येतो. वेळोवेळी आरक्षणाच्या संदर्भात वाद होताना दिसतो. आर्थिक विषमता अजूनही पूर्णपणे दूर झालेली नाही. यावर उपाय म्हणून समानतेचे तत्व प्रभावीपणे अंमलात आणण्याकरिता निरंतर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

## ❖ निष्कर्ष :

लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत आधारस्तंभ म्हणून भारतीय संविधानातील समानतेच्या हक्काकडे पाहता येईल. यात अनुच्छेद १४ ते १८ याद्वारे कायद्यासमोर समानता, कोणत्याही कारणाआधारे भेदभावास मनाई, सार्वजनिक रोजगारात संधीची समानता, अस्पृश्यतेचा अंत तसेच पदव्यांची समाप्ती या तरतुदीच्या आधारे सामाजिक, आर्थिक तसेच राजनैतिक न्याय निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. समानतेची संकल्पना ही निव्वळ औपचारिक नाही तर दुर्बल आणि मागास घटकांकरिता खास उपाययोजना करुन प्रत्यक्षरित्या समानता प्रस्थापित करण्यावर सुद्धा भर दिला गेला आहे. भारतीय समाजात असलेली ऐतिहासिक विषमता, जातीआधारित भेदभाव तसेच सामाजिक अन्याय नष्ट करण्याकरिता 'समानतेचा हक्क' हे एक प्रभावी माध्यम आहे. या

https://doi.org/10.69758/GIMRJ/2602S02V14P006

हक्कांचा व्यापक अर्थ लावून त्याचे संरक्षण करण्याचे काम न्यायव्यवस्थेने विविध निर्णयांच्या माध्यमातून केलेले आहे. म्हणूनच समानता ही निव्वळ कायदेशीर संकल्पना नाही तर समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.

थोडक्यात भारतीय संविधानात असलेल्या समानतेसंदर्भातील तरतुदी ह्या लोकशाही मूल्यांना मजबूत करतात तसेच हरएक नागरिकांना सन्मान, संधी तसेच न्याय मिळण्याच्या उद्देशाकडे देशाला मार्गदर्शन करताना दिसतात.

❖ **संदर्भ सूची :**

1) आंबेडकर, भिमराव, रामजी (२००५), अस्पृश्य मूळचे कोण?, नागपूर: रोडगे प्रकाशन
2) आंबेडकर, भिमराव, रामजी (२०२२), भारताचे संविधान, नागपूर: युगसाक्षी प्रकाशन
3) काश्यप, सुभाष (१९९९), हमारा संविधान, नयी दिल्ली: प्रकाशन नेशनल बुक ट्रस्ट
4) बसू, दुर्गा दास (२०१६), भारतीय राज्यघटनेची ओळख, गुरुगाव-हरियाणा: लेक्सीस-नेक्सीस प्रकाशन
5) भोळे, भास्कर, लक्ष्मण (२००३), भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, नागपूर: पिंपळापूरे अँड कंपनी, पब्लिशर्स
6) मल, डॉ. पूरण (२००५), भारत का संविधान, जयपूर: अविष्कार पब्लिशर्स
7) मेश्राम, प्रकाश, बोरकर, डॉ. अशोक (२०२५), अस्पृश्यता आणि भारतीय संविधान, Gurukul International Multidisciplinary Research Journal, E-ISSN No. 23948426, Special Issue on Scientific Research, Issue VII (I), Volume -XIII
8) Joshi, G.N., (1954), The Constitution of India, London : Macmillan & Co. ltd.
9) Lal, Girdhari (1954), A Critical study of the constitution of India, Allahabad; The Indian Press (Publication)
10) Singh, K.S., (1992), People of India : Introduction (National Series Volume 1) New Delhi : Oxford University Press